# मनुष्य समाजाचा अविभाज्य घटक

## दीपक केसरकर : दोडामार्ग येथील आपत्ती कार्यशाळेत मार्गदर्शन

कसई दोडामार्ग : जीवनात कोणतेही काम करताना कोणीही कमीपणा बाळगू नये. आपल्याला मोठं व्हायचं असेल, तर कामाशी एकनिष्ठ राहून न लाजता ते प्रामाणिकपणे करावे. मनुष्य हा समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. समाजाच्या आपल्याकडून काही अपेक्षा असतात व आपणही समाजाचे देणं लागतो. समाजाचे हे ऋण फेडण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केला पाहिजे, असे प्रतिपादन पालकमंत्री दीपक केसरकर यांनी केले.

मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना व लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेचे उद्घाटन पालकमंत्री केसरकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

पालकमंत्री केसरकर पुढे म्हणाले, सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन विकास झाला पाहिजे. त्यासाठी तरुणांनी प्रशिक्षित होऊन पुढाकार घेतला पाहिजे. खेडी स्वयंपूर्ण झाली तरच देश स्वयंपूर्ण होईल, हे जाणूनच महात्मा गांधींनी 'खेड्यांकडे चला' हा संदेश दिला. देशाच्या विकासात तरुणांचे योगदान महत्त्वाचे आहे. मात्र, विकास साधण्यासाठी निसर्ग आणि उद्योग यांची योग्य सांगड घालावी, असे केसरकर म्हणाले. यावेळी त्यांनी महाविद्यालयाला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

शिरीष नाईक



हळबे महाविद्यालयात आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळेत पालकमंत्री दीपक केसरकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी बाबूराव धुरी, डॉ. व्ही. ए. पाटील आदी उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी संस्थेचे सदस्य व स्वातंत्र्यसेनानी भाई परमेकर होते. त्यांच्या हस्ते पालकमंत्री केसरकर यांचा सत्कार करण्यात आला. तर प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांच्या हस्ते मुंबई विद्यापीठ एन.एस.एस. विभाग समन्वयक प्रा.बी. एस. बिडये यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. व्ही. ए. पाटील यांनी केले. या शिबिराची संकल्पना, महत्त्व, उद्दिष्ट्ये प्रा. बी. एस. बिडये यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर प्रांताधिकारी व्ही. जी. इनामदार, तहसीलदार संतोष जाधव, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य बाबूराव धुरी, सूचन कोरगावकर, उपसभापती आनंद रेडकर उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी डॉ. एस. यू. देरेकर, प्रा. आर. ए. मोरे यांनी तसेच प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. सूत्रसंचालन प्रा. सोपान जाधव, आभार प्रा. आर. ए. मोरे यांनी मानले. (वार्ताहर)